वाचले क्र.१) मा.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचेकडील जा.क्र.पोआ/२४९८/२०२० दि.२२/०३/२०२०
२) मा.पोलीस आयुक्त कार्यालय यांचेकडील जा.क्र.२००९/तोकोना/मनाई/आदेश/२० दि.२३/०३/२०२०
३) प्रशासन विभागाकडील आदेश क्र.प्रशा/१/कावि/४१८/२०२० दि.२४/०३/२०२०
४) प्रशासन विभागाकडील आदेश क्र.प्रशा/१/कावि/४४०/२०२० दि.३०/०३/२०२०
५) महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.समय२०२०/प्र.क्र.३५/१८ (र.व.का.) दि.१८/०४/२०२०
६) महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.समय२०२०/प्र.क्र.३५/१८ (र.व.का.) दि.२२/०४/२०२०
७) दि.२६/०५/२०२० चा मंजुर कार्यालयीन प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११०१८, **लेखा विभाग**
क्र.लेखा/१४/कावि/३५७ / २०२०
दिनांक २६ / ०५ /२०२०

**विषयः- कोरोना विषाणू Covid-19 प्रतिबंधात्मक उपाय अंतर्गत लेखा विभागाकडे प्राप्त होणा-या देयके स्विकृतीच्या कामकाजाबाबत....**

**आदेश,**

महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणुचा Covid-19 प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३/३/२०२० पासुन लागु करून खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे.

कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन पिंपरी चिंचवड मनपाच्या कार्यक्षेत्रातील सर्व सार्वजनिक ठिकाणे नागरिकांसाठी बंद करण्यात आलेली आहेत. प्रस्तुत विषयाचे कामकाजासंदर्भात वेळोवेळी मा.विभागीय आयुक्त, मा.जिल्हाधिकारी, मा.आयुक्त व शासन स्तरावरून बैठका घेवुन उपाययोजना करण्यासंदर्भात युध्द पातळीवर निर्णय घेण्यात आले आहेत.

पिंपरी चिंचवड मनपाच्या लेखा विभागामध्ये मनपाच्या विविध विभागांची देयके अदायगीची कार्यवाही करण्यात येते, लेखा विभागाचे जागेचे क्षेत्रफळ (अधिकारी केबिन वगळुन) अंदाजे १५५० चौ.फु.इतके कमी आहे. व त्यामध्ये एकुण ५५ कर्मचारी कार्यरत आहेत तसेच लेखा विभागामध्ये मनपाच्या विविध विभागातील व विविध बँकांचे अधिकारी/कर्मचारी व लेखा विभागाशी संबंधित नागरिक यांचा मोठ्या प्रमाणावर वावर असतो. त्यामुळे लेखा विभागाची जागा अपुरी पडत असल्याने लेखा विभागामध्ये मोठी गर्दी होत आहे, ही गर्दी,वावर कमी करण्याच्या दृष्टीने व कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव कमी होण्याच्या अनुषंगाने लेखा विभागामध्ये देण्यात येणा-या देयकांची स्विकृती व आक्षेपित देयके घेण्यासाठी लेखा विभागाचे कॅश काऊंटर / चेक वाटप काऊंटर बाहेरून खिडकीद्वारे घेतल्यास कोरोना विषाणुचा संसर्ग कमी होण्यास मदत होईल.

सबब, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११०१८ या आदेशान्वये लेखा विभागामध्ये देण्यात येणा-या देयकांची स्विकृती व आक्षेपित देयके घेण्यासाठी लेखा विभागाचे कॅश काऊंटर / चेक वाटप काऊंटर बाहेरून खिडकीद्वारे देयके घेण्यास व देण्यास मान्यता देत आहे. सदर आदेशाची नोंद सर्व विभागांनी घ्यावी.

**(श्रावण हर्डीकर)**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११०१८

प्रति,
सर्व संबंधित विभागप्रमुख
प्रत
१) सुरक्षा विभाग २) स्थापत्य विभाग